राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे-३०.

'STARS' प्रकल्पांतर्गत

# पायाभूत चाचणी : २०२४-२५

## इयत्ता - तिसरी ते नववी : विषय - गणित

## शिक्षकांसाठी सूचना

**भूमिका व दृष्टिकोनातील बदल :**

राज्यस्तरावरून 'STARS' प्रकल्पांतर्गत 2024-25 या शैक्षणिक वर्षात नियतकालिक मूल्यांकन अंतर्गत पायाभूत चाचणी, संकलित चाचणी - 1 व संकलित चाचणी - 2 अशा तीन चाचण्या घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. इयत्ता तिसरी ते नववी पर्यंतच्या प्रत्येक विद्यार्थ्याने वयोगटानुरूप अपेक्षित अध्ययन संपादणूक प्राप्त केली आहे किंवा नाही, याची तपासणी या चाचण्यांद्वारे करता येईल.

या चाचण्यांद्वारे विद्यार्थी संपादणुकीचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करून गुणवत्ता समृद्धीसाठी आवश्यक उपाययोजना करणे तसेच शाळाधारित मूल्यांकन प्रक्रियेचे बळकटीकरण करणे हा उद्देश आहे.

यानुसार राज्यस्तरावरून 2024-25 या शैक्षणिक वर्षात इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्ती आधारित इयत्ता तिसरी ते नववीच्या विद्यार्थ्यांची पायाभूत चाचणी घेण्यात येत आहे. सदर चाचणीचा मुख्य उद्देश, विद्यार्थ्यांनी अध्ययन निष्पत्ती किती प्रमाणात प्राप्त केलेल्या आहेत, हे शिक्षकांनी लक्षात घेऊन गरजेनुरूप कृती-कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे हा आहे.

**चाचणीचे स्वरूप :**

- पायाभूत चाचणी ही अध्ययन निष्पत्तीवर आधारित असून ती इयत्ता तिसरी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक, तोंडी व लेखी स्वरूपाची आहे.
- पायाभूत चाचणी विकसित करताना त्या मागील इयत्तेमधील विषयनिहाय अध्ययन निष्पत्ती व आवश्यक मूलभूत गणिती क्षमता/क्रिया विचारात घेतल्या आहेत.

| इयत्ता | प्रात्यक्षिक आणि तोंडी | लेखी | एकूण |
|---|---|---|---|
| तिसरी | 10 | 30 | **40** |
| चौथी | 10 | 30 | **40** |
| पाचवी | 10 | 40 | **50** |

| इयत्ता | प्रात्यक्षिक आणि तोंडी | लेखी | एकूण |
|---|---|---|---|
| सहावी | 10 | 40 | **50** |
| सातवी | 10 | 50 | **60** |
| आठवी | 10 | 50 | **60** |
| नववी | 10 | 50 | **60** |

**चाचणी नियोजनकरिता सूचना :**

- पायाभूत चाचणीचे पूर्वनियोजन, प्रत्यक्ष चाचणी घेणे आणि माहितीचे संकलन अशा तीन टप्प्यांचे नियोजन शिक्षकांनी इयत्तानिहाय व विषयनिहाय करावे.
- प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेसाठी लागणारे साहित्य शिक्षकांनी चाचणी सुरू करण्यापूर्वी तयार ठेवावे.
- विद्यार्थी संख्येनुसार वेळेचे नियोजन करावे.
- प्रात्यक्षिक व तोंडी व लेखी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ द्यावा.
- विद्यार्थ्यांना प्रश्नाचे आकलन न झाल्यास शिक्षकांनी त्यांना प्रश्न समजण्यासाठी साहाय्य करावे; मात्र उत्तराचा संकेत देऊ नये.
- संबंधित वर्गाच्या गणित विषय शिकविणाऱ्या शिक्षकांनीच ही चाचणी विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्यावी.
- चाचणी तपासताना प्रश्नांचे गुण पूर्णांकात द्यावे. अर्धा गुण देऊ नये.
- प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेसाठी विचारावयाच्या प्रश्नांचा समावेश मूळ प्रश्नपत्रिकेत करण्यात आलेला आहे.
- प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेची उत्तरे व कृतीसाठी वेगळा कागद वापरून त्यात विद्यार्थ्यांना आपले प्रतिसाद नोंदवण्यास सांगावे.
- सदर तोंडी चाचणीचे प्रश्न नमुनात्मक आहे. शिक्षक त्याच अध्ययन निष्पत्तीवरील इतर प्रश्न विद्यार्थ्यांना विचारू शकतात.

**चाचणीनंतर :**

1) चाचणीची उत्तरपत्रिका तपासल्यानंतर विद्यार्थ्यांच्या गुणांची नोंद गुणनोंदणी तक्त्यात करावी.
2) गुणनोंदणी तक्त्यातील गुणांचे विश्लेषण करावे.
3) ज्या क्षेत्रांतील अध्ययन निष्पत्तीमध्ये विद्यार्थी मागे आढळतील त्या विद्यार्थ्यांसाठी गरजेनुसार कृती कार्यक्रमांची निर्मिती व अंमलबजावणी करावी.
4) ज्या अध्ययन निष्पत्तीमधील विद्यार्थ्यांची संपादणूक कमी आढळेल त्या घटकांचा पुनर्अध्यापन, सराव व उजळणी करून घ्यावी.